पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

अ प्रभाग समितीची विशेष सभा(अंदाजपत्रकीय)

सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 6]

दिनांक : 16/02/2022

वेळ : सकाळी 11.00 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2021-22 चे सुधारित व सन 2022-23 चे मुळ अंदाजपत्रकासंबंधी अ प्रभाग समितीची विशेष सभा बुधवार दिनांक 16/02/2022 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.यादव मिनल विशाल | सदस्या |
| 4. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 5. | मा.शर्मिला राजू बाबर | सदस्या |
| 6. | मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती शितल वाकडे- प्र. क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार- कार्यकारी अभियंता (स्थापत्य),मा.प्रवीण घोडे- कार्यकारी अभियंता(विद्युत), मा.श्री शिवाजी लोखंडे-लेखाधिकारी, मा. श्री. काशिद ए.एल.-उपअभियंता (ड्रेनेज), मा,श्री लांडे बी.पी.- उपअभियंता(विद्युत), श्री पवार व्ही.एस.-कनिष्ठ अभियंता-विद्युत, श्रीमती पी.के.सोनवणे- कनिष्ठ अभियंता(जलनि:स्सारण),श्री स्वप्रील पाटील कनिष्ठ् अभियंता (स्थापत्य्), श्री मनोज शिंदे-मुख्य लिपिक, श्री जयंत मरळीकर.-मुख्य् लिपिक (अतिक्रमण),श्री पगार एस.जी.- जनरेटर ऑपरेटर, इ. पदाधिकारी/ अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

मा. सभापती, शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली. मा. क्षेत्रीय अधिकारी, श्रीमती शितल वाकडे यांनी अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2021-22 चे सुधारित व सन 2022-23 चे मुळ अंदाजपत्रक मा. प्रभाग समितीसमोर अवलोकनार्थ सादर केले.

(कृ.मा.प.)

ठराव क्रमांक 27 विषय क्रमांक 1

दिनांक 16/2/2022 विभाग : लेखा

सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ:-मा. लेखा अधिकारी, अ क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक अक्षेका/लेखा/कावि/ ४७/२०२२, दिनांक ११/०२/२०२२ चे अनुषंगाने

अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2021-22 चे सुधारित व सन 2022-23 चे मुळ अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 (सुधारित नांव THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATION ACT (Act No. LIX of 1949) चे कलम २९(अ) मधील कलम ७ चे पोटकलम (ब) नुसार मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

---

तदनंतर मा. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे,सभापती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून प्रस्तुतची विशेष सभा संपल्याचे जाहीर केले

[मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक- अक्षेका/9/कावि/17/2022
दिनांक- 17/2/2022

(शितल वाकडे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,

सर्व संबंधित -----------------------